सप्तमंत्ररामायण

बालकांड

(अनुष्टुप्वृत्त)

श्रीपति प्रार्थिला मत्ता माराया दशकंधरा,
देवानीं सद्धितें ज्यांचीं नेत्राब्जें आठ[1] पंधरा[2]. १
राज्या दशरथाचा तो चतुर्मूर्ति महायशा
पुत्र झाला रामनामा, विश्वा आली शुभा दशा. २
महात्मा राम कौसल्यापुत्र हा ज्येष्ठ सांवला,
सन्नेत्रांतें सद्गुणाब्धि तो म्हणेल न कां 'वळा'? ३
जगन्नाथांश भरत कैकेयीचा मुल क्षण[3],
पुत्र लक्ष्मण शत्रुघ्न सुमित्रेचे सुलक्षण. ४
यज्ञावनें हर्ष देती रामलक्ष्मण गाधिजा,
अहल्येच्या समुद्धारें गौतमा बहु आधि ज्या. ५
राजकोदंड मोडूनि रामें वारिलि भूसुता,
जनकाच्या तिघी रामानुजाहीं सज्जनस्तुता. ६
महाप्रतापा पहिल्या रामातें नव राम हा
जिंकी, या विजयाऐसा दुजा दे न वरा महा. ७
जयाधिक गमे शांता पराजय हि तो, 'दया
केली' म्हणे 'बा विश्वेशा! निजधर्महितोदया.' ८
यश गाय, म्हणेना चि स्वांतीं भार्गवराम 'हा!'
पावे स्वीकारुनिपुन्हां निजमार्गवरा महा. ९
जगतीपति पुत्राच्या विजयें बहु हर्षला,
स्वाम्युत्कर्षें पुरीं पौर स्फार प्रेमाश्रु वर्षला. १०

---

१. ब्रह्मा—पंत. (ब्रह्मदेव चतुर्मुख म्हणून आठ नेत्रांचा). २. शिव—पंत. (शिव पंचानन; प्रत्येक आननास तीन नेत्र म्हणून पंधरा नयनांचा). ३. उत्सवरूप—पंत.

यथाविधि गृहीं पुत्र प्रवेशवि सदार ते,
पुत्रभाग्योदयीं भूप तद्गुणीं च सदा रते. ११
राजाज्ञेनें निजपुरा नेला भरत मातुळें,
म्हणे त्या लोक, 'रविसीं तेजें चंद्रसमा तुळें.' १२
मनोज्ञरूपा भरता शत्रुघ्ना देखते जन
वदले, 'गोमटें यांचें ऐसें तें लेखतेज न.' १३

इति बालकाण्डः

अयोध्याकांड

भू श्रीरामकरीं द्याया युवराज करावया
योजी राजा, गुरु म्हणे, 'हा विचार बरा वया.' १
सा रा विचारा या मोडी कैकेयी मंथरामतें,
वर साधी, करि, धरी वन्यांचा पंथ राम, तें. २
'हो म न्वब्द वनीं राम स्पष्ट वल्कजटाधर,
रक्षो भरत पृथ्वीतें, हे माझे दे मला वर.' ३
रा ज वर्य जरि प्रार्थी, न वळे, खवळे असें
कळे, निघे राम सीता सौमित्रि प्रीतिच्या रसें. ४
हो य प्रहृष्टा कैकेयीमंथराशक्रधी, 'रहा
क्षण' भूप म्हणे; तेव्हां वदले सर्व धीर 'हा!' ५
ध रा पति रथीं वाहों सांगे, सूत तसें करी;
गुहासि भेटे, फिरवी प्रभु हा विनवी परी. ६
स्व म स्तकीं बंधुच्या ही जटा रचि, गुहा तरी
मागे, गंगा तरे, वंदी भरद्वाजपदें हरी. ७
'द्वि ज वर्या पुसे, राहे चित्रकूटीं' असें पुरीं
सूत सांगे, मरे भूप, शोकशूळ सिरे उरीं. ८
प्र य लें भरत क्षिप्र आणिला, बहु तो रडे,
कैकेयीचे लागले त्या मृदुला बोल कोरडे. ९
नि ज मातेसि धिक्कारी, पित्याची करुनि क्रिया,

गेला शरण रामाला आणाया, श्री न ज्या प्रिया. १०
त्या य शोनिधि सांगे, 'बा! ताताचें सत्यरक्षण
आम्हीं करावें, सोडावा त्वां त्यां ही धर्म न क्षण.' ११
घे रा ज्याच्या रक्षणा तो पादुका प्रभुच्या, फिरे,
नंदिग्रामीं वसे वल्की, मनें ही न पुरीं शिरे. १२
त्या म हीध्रा त्यजी राम जाय अत्र्याश्रमास, ती
अनसूया अंगरागें हरि श्रीच्या श्रमा सती. १३

इत्ययोध्याकांड:

अरण्यकांड

हरि श्री तें त्या विराधा राक्षसा राम दे गती,
दंडकीं मुनि रक्षी, जी दया करावि वेग ती. १
साग रा चा प्राशिता जो दे शस्त्रें यासि तो जुनीं
पादानता शिष्यसमा सदाशीराशि योजुनीं[1]. २
जो स म र्थ स्वताताचा सखा गृध्र जटायु तें[2]
त्या दे गुरुत्व की वंदी शिरें भव्यें जटायुतें. ३
राहे ज गत्पति प्रेमें उटजीं गौतमीतटीं,
रामीं शूर्पणखा लोभे, शुनी जेंवि सुधाघटीं. ४
अन्या य ज्ञ लक्ष्मणें ती प्रभूक्तें नीट दंडिली,
खरसेना रामभद्रें लीलेनें मग खंडिली. ५
कोपे रा वण तो दावी सुवर्णहरिणा महा,
तल्लोभ श्री धरी त्याचा म्हणवी परिणाम ६
तो हे म हरिण श्रीनें धराया प्रार्थितां वनीं
शिरे प्रभु, शरें ताडी, तच्छब्दें भी सती म ७
सीता ज पोनि कपटें दशानन जटायुतें
पाडी, ने, सिंधु शोपाया पाहे मूढ घटायु ८
अप्रि य प्रभुला भ्राता सांगे, धावोनि देखिलें,

१. यज्ञ करवून. २. यत् स्वपितरि प्रसिद्धं—पंत.

जसें उटज तें शून्य तसें विश्व हि लेखिलें. ९
शोधी ज नकजा, खेण तसा 'हाय!' वदे 'वहा
शोकपूरीं' म्हणे एणा खगा व्याघ्र हि देव हा. १०
तों हो य शोक शोकांत गृध्र सक्षत पाहिला
'सीता दशमुखें!' ऐसें सांगतां स्तब्ध राहिला! ११
करी रा जीवनयन शरीरा त्याचिया करें
संस्कार जेंवि ताताच्या, गावें हें यश शंकरें. १२
धरी म हाक्रूर जो दे त्या कबंधासि कामग
विमान; शबरीला ही, पंपेला पावला मग. १३

इत्यरण्यकांड:

किष्किंधाकांड

विरही श्री श पंपेच्या तीरीं 'हाय!' म्हणे, मग
भेटे हनूमान् सुग्रीव, सीतेचे दाखवी नग. १
जो वान रा धीश बळी मत्त तो खळ मारिला,
वारिला ताप, सुग्रीव, केला कीशेंद्र, तारिला. २
सुकंटें म ग शोधाया सीता पाठविले हरी,
संपाती शोध सांगूनि अंगदादि सुखी करी. ३
तो अग्र ज जटायूचा सांगे, "मीं अनुजासह
गेलों पहाया अरुणा, न सोसे भानुचें मह. ४
प्राणप्रि य स्वानुज त्यां झांकिला तनुच्या तळीं,
मत्पक्ष दग्ध झाले, मीं पडलों या महाचळीं. ५
रक्षी ध रा सुर मला महेंद्रीं तो निशाकर,
ताप माझा हरी जैसा चकोराचा निशाकर. ६
तो म्हणे म ज, 'या स्थानीं रहा ऐसा चि तोंवरी,
श्रीतें शोधावया येथें येतील प्रभुचे हरी[1]. ७
प्रवृत्ति[2] ज गदीशाच्या प्रियेची त्यांसि तूं सुखें

१. वानर. २. शोध.

१. ब्रह्मा-
पंचानन; प्रत्

सांग, तत्काळ येतील पक्ष, क्रीड नभीं सुखें." ८

ये प्रत्य य हि जों ऐसी दग्धपक्षकथा कथी,
सपक्ष होउनि उडे तत्संदेहाचळा मथी. ९

लंघाया ज लधी कोण्ही शतयोजन न क्षम,
म्हणे अंगद, 'जातों मीं, जाणें येतां न विक्रम.' १०

आत्मश्रे य सुकंठश्रीरामप्रिय सुखें घडे,
ऐसें कोणा हि न सुचे, सर्व ही संकटीं पडे. ११

त्या ऋक्ष रा जें वाराया सर्वांची ही मनोव्यथा,
वायुजा कथिली त्याची जन्मकर्ममहाकथा. १२

स्तवें स्व म हिमज्ञानें उत्साहें दशयोजन
वाढे, म्हणे नारदादि, 'या वीरा यश यो' जन. १३

इति किष्किधाकांड:

सुंदरकांड

वायुपुत्र श्री पहाया उडे गरुडसा रयें,
यादें यादोनिधिस्थें ही लक्षशा कांपलीं भयें. १

वक्षप्रहा रा मैनाक क्षमला न सहावया,
देव देवर्षि ही आले तत्कौतुक पहावया. २

सुरसा श्र म रप्रोक्ता गिळाया पसरी मुख
शत गावें त्यांत शिरे, निघे, दे वासवा सुख. ३

मरुदात्म ज मारी त्या सिंहिकेतें, वरें धरी
छाया ओढी, गिळी पापा, सागरीं दारुणा खरी. ४

तो उम्रर य ये पारा, करी गोष्पद सागरा
ती अशोकवनीं पाहे, केली माता जिणें धरा. ५

तों ये कामी रा क्षसेंद्र, 'स्वप्रिया हो' म्हणे खळ,
श्री वदे प्रभुच्या तेजें 'न तूं ही खरसा जळ.' ६

पापी जाय, म रुत्पुत्र मुद्रा दे श्रीस वांचवी,
तच्चूडामणि घे खूण स्वांतीं संदेश सांचवी. ७

शाखी भंगी, ज न्यकामें मारी अक्षा महाबळा,
ब्रह्मास्त्रा मान दे, मेघध्वाना हा सांपडे खळा. ८

म्हाया स्वामि थ श क्रूरा रावणातें म्हणे, 'अरे!
वांच, वांचविल्या देवी दे वीराधीश्वरा अरे!' ९

क्षोभतां, अं ज लि करी बिभीषण म्हणे, 'अहो!
अवध्य दूत, जो याचा स्वामी तो विजयी म हो.' १०

तो धनंज य तत्पुच्छीं पेटवी, वीर वायुभू
जाळी पुरी; म्हणे, 'याला असो पुष्कळ आयु' भू. ११

पुच्छ पाथो रा शिमध्यें विझवी, रिझवी, सुर,
निववी स्वसहायांतें तप्तांतें जेंवि कापुर. १२

श्रीचा चूडा म णि श्रीशा दे, निरोप कथी तया,
जयाधार प्रभु प्रेमें भेटे, वर्णी, करी दया. १३

इति सुंदरकांड:

युद्धकांड

सौमित्रियुक्त श्री राम सुग्रीवानुमतें बळें
घे, जाय सिंधुतीरा जो ध्यावा गावा सदा नळें. १

बिभीषण ब रा धर्मन्याय सांगे, तया खळ
अपमानी, तौ[3] शरण्या रामा वंदी गुणोज्वळ. २

राक्षसांचा तौ म हीश श्रीशें केला, नदीपती
सेतुनें लंघिला, राजा[4] भंगी त्या जो छळी सती. ३

अंगदोक्तें न ज गतीसुता दे, युद्ध आदरी,
मारवी बळ तत्पाळ, भंगे आपण ही अरी. ४

नागांतकें भ य श्रीचें चमूचें नागपाशज
हरी, मारी कुंभकर्णा मग, जो उद्धरी गज. ५

घननादें बाँ[5] रा सारें खिळितां, वायुनंदन

---

१. युद्धाच्या इच्छेनें. २. आशीरष्पत्र–पंत (?) ३. बिभीषण–पंत. ४. सुग्रीव–पंत. ५. शरवृष्टीनें.

दिव्यौषधीनीं उठवी, समजे तारि मंद न. ६
मायासीतेसि म थितां वननादें, रडे बळ
छळज्ञ तो लक्ष्मणानें प्रयत्नें वधिला खळ. ७
शोकें क्षोभोनि ज गतीसुताघातार्थ हा निघे,
सुपार्श्व मंत्री सुयश श्रीची वारूनि हानि घे. ८
बळकोटिक्ष य रणीं करवी, लक्ष्मणा[1] अरी
पाडी स्वशक्तिनें, स्वस्थ पुन्हां मारुति या करी. ९
हरि दे रथ ज न्यार्थ, प्रभु बैसे तयावरी,
सप्ताहांतीं[2] रावणांत ब्रह्मास्त्रें कौतुकें करी. १०
श्रीरामविज य स्वर्ग सत्य कैलास हर्षवी,
प्रभूत वाद्य सद्गीत पुष्प प्रेमाश्रु वर्षवी. ११
क्रिया राक्षस रा ज्याची बरवी करवी, मग
बिभीषणा पदीं स्थापी. श्री दिव्यें हर्षवी जग. १२
पुष्पकें ये प्रे म निधि, आत्या भेटे, बसे पदीं;
प्रभूदयीं जगें हृष्टें जसीं यादें सुधानदीं. १३

इति युद्धकांडः

उत्तरकांड

कुंभोद्भवमुखें श्री श शत्रुचा मानुनि प्रिय
ऐके पूर्वचरित्रास पैरित्रासहराक्रिय. १
जगत्प्राणकुमा रा चें जन्मकर्म दिला वर
ब्रह्मादिकीं तें चरित प्रेमें ऐके[4] इकावर. २
जे नाशिते पर म हा कपिराक्षसनायक,
त्यांतें पूजी परम हा स्वाश्रितोत्सवदायक. ३
साधितातिस्वभ ज ना सदार प्रभु वातजा
पूजी, सदिष्ट वर दे, काळें स्पर्शे न घात ज्या. ४

१. हस्तदोष—लक्षणा. २. सात दिवसांच्या शेवटीं. ३. भयहारक क्रिया ज्याची असा (राम). ४. हस्तदोष—पूके.

प्रजातें रंजवी य त्नें, निंदितां श्रीस हि त्यजी,
स्वर्णश्रीसीं करी यज्ञ अश्वमेधादि नित्य जी! ५
पक्षी श्वान हि ता रा या धर्में न्यायें न आळसे,
काळ सेवकसा लोकां भी, कीं ते प्रभुबाळसे. ६
जो विप्राचा सुत म रे त्यातें तत्काळ वांचवी,
मारवी शत्रु, भरतीं शत्रुघ्नीं यश सांचवी. ७
जानकीचे तनु ज ते कृती कुश लव, स्वयें
वाल्मीकिनें पढविलें त्यांसि 'रामायण' स्वयें[1]. ८
तद्गीत ऐके स्व य श प्रसन्न प्रभु होय ज्या
चकोर केलें सत्काव्यें चंद्र तन्मुखतोयजा. ९
प्रभु श्रीतें, 'दिव्य ज नप्रत्ययार्थ' म्हणे 'करीं'.
ती 'शुद्धा तरि घे' ऐसें वदे, जाय धरोदरीं. १०
चौघांचे धर्मन य पितृ पुत्र आठ गुणाकार
श्रीरामें ते सर्व राजे केले, घेते उणा कर. ११
सत्यसंध सदा रा ध्य प्रभुप्राण बहिश्चर
जो लक्ष्मण तया त्यागी घडतां वागनादर[2]. १२
प्रजा सर्वा हि वि म ळा विमानांमाजि वाहिल्या,
नेल्या स्वलोका ताराया, कथा श्रोत्यांसि राहिल्या.
'सप्तमंत्रात्मक' प्रेमें मयूरें रामनंदनें
'रामायण' श्रीरामीं हें अर्पिलें कृतवंदनें. १४

इति श्रीसप्तमंत्ररामायणं संपूर्ण।

१. सुष्ठु शुभावह विधिनें—पंत. २. वचनभंग.